
ISSN No. : 2250-1649

# मुराळी

मार्च २०२१ | मूल्य :२० रुपये



वर्ष तेरावे । अंक एकशे त्रेपन्न
मार्च, २०२१

परिवर्तनाचा
# मुराळी

संपादक : राजन गवस
**कार्यकारी संपादक**
तुकाराम ऊर्फ टी. एस. गडकरी
**संपादक मंडळ**
आसाराम लोमटे । नंदकुमार मोरे ।
गजानन जाधव । आप्पासो बुडके । तेजस चव्हाण
विजय बालघरे । संजय खोचारे
**सल्लागार मंडळ**
मेघा पानसरे । तनुजा शिपूरकर ।
सौ. ऊर्मिलादेवी श्रीपतराव शिंदे ।
सुचेता कोरगांवकर
**कायदा सल्लागार**
अॅड. ए. पी. पाटील (सांगाव कागल)
**अक्षर जुळणी**
आप्पासो बुडके
**जाहिरात व वितरण**
डी. के. पाटील, शिवाजी देसाई
**मुद्रणस्थळ**
भारती मुद्रणालय, कोल्हापूर
**व्यवस्थापक**
**बी. वाय. पाटील, राम मेढेकर**
संपर्क फोन नं. : ०८२७५४४९६१६,
०९४२११३८८७२, ९७६५७८७३१३

वार्षिक वर्गणी : रु. २००/-, तीन वर्षांसाठी : रु. ५००/-
बँक खाते नं. Bank of Baroda, Murali Trust
A/c. No. 38120100000285, IFSC - BARB0GARGOT

**पत्ता :** संपादक मुराळी, मु. पो. गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. पिन ४१६ २०९

## अनुक्रमणिका

**शहाजी महाराज : हिन्दोस्थानीयत**
प्रकाश पवार / ४

**मानवी कला : निर्मिती हेतू, उत्पत्ती सिद्धान्त आणि लौकिकतावाद**
किरण गुरव / १७

**क्रांतिवीरांगणा – मुक्ताबाई साठे**
शरद गायकवाड / २६

**प्रस्थापित व्यवस्थेत अगतिक झालेला बाप आणि काळोखाच्या कविता**
शोभा नाईक / ३०

हे मासिक प्रकाशक, मुद्रक राजन गवस यांनी भारती मुद्रणालय येथे छापून मु. पो. गारगोटी येथे प्रसिद्ध केले. या मासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांचे अंशतः अनुदान मिळाले आहे. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई व संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच, असे नाही.

# प्रस्थापित व्यवस्थेत अगतिक झालेला बाप आणि काळोखाच्या कविता

शोभा नाईक

कविता संवेदनशील माणसाच्या भावभावनांचा, त्याच्या विचारांचा, त्याच्या अनुभवविश्वातून येणाऱ्या अनुभूतींचा लयबद्ध आविष्कार साधण्याचा प्रयत्न करत असते. तिच्यातून प्रकटणाऱ्या व्याकुळतेमुळे ती वाचकाच्या हृदयाला थेट स्पर्शत असते. पुष्कळदा वैयक्तिक स्वरुपाची कवीची भावानुभूतीही प्रातिनिधिक पातळीवर जाऊन पोहचत असते. कवीच्या माध्यमातून माणसाच्या प्रतिक्रिया ती व्यक्त करत असते. ह्या प्रतिक्रिया वास्तविक त्या त्या पर्यावरणाच्या स्वरूपावर प्रकाश टाकताना आपल्याला मदतच करत असतात. काळोखाच्या कविता या नामदेव कोळी यांच्या काव्यसंग्रहातील कविता यापैकी कोणती अनुभूती देतात ते पाहायचे असे मनाशी योजून काव्यसंग्रह वाचायला घेतला. ती कोणत्या काळोखाविषयी बोलते आहे हा प्रश्नही समोर होताच. या कवितांच्या वाचनातून प्रामुख्याने वर्गभेदाचा भारतीय पारंपरिक काळोख येथे आविष्कृत होऊ पाहतो असे दिसते. बिहारमधील बटाईदारांची आठवण व्हावी असे शेतमजुरांचे हलाखीचे जगणे या कवितांच्या आस्थेच्या कक्षेत सामावलेले दिसते.

काळोखाच्या कविता या प्रकाशित कविता संग्रहात मोजक्याच कविता दिसतात. अर्थात त्या किती आहेत यावरून कवितेची गुणवत्ता कधीच ठरत नाही. वैशिष्ट्य म्हणजे ती खूपच थेट कविता दिसते. कोणत्याही पारंपरिक पध्दतीच्या प्रतिमा, प्रतिके, रूपके जुळवण्याची असोशी येथे आढळत नाही. वाट्यास आलेल्या जगण्यात जशी वाटचाल झाली तशी त्या वाटचालीची थेट चित्रे कवीने काढलेली दिसतात. कुठेही कवितेत रोमांचकारक पद्धतीच्या अनुभूती प्रकटलेल्या आढळत नाहीत. तो आणि ती यांच्यामधील धाग्यांच्या गुंत्यांत कविता अडकलेली दिसत नाही. आपल्या घरगुती अडीअडचणींतून मार्गक्रमण करताना कवीने आपला डोळा स्वतःवर, स्वतःच्या मातापित्यावर, बहिणभावंडांवर खिळवलेला दिसतो. आजचे वास्तव भेदण्याचा प्रयत्न तिला करायचा आहे असे दिसते. प्रस्तुत संग्रह हा आत्मकथनात्मक कवितांचा एक वस्तुनिष्ठ प्रयोग वाटतो. कवीचे भोवताल हेच येथे वस्तू बनले आहे. ही वस्तू जशी आहे तशी रेखाटली जाते आहे. त्यातून अलीकडच्या आभासी दुनियेच्या विळख्यातून जातानाही मुळाशी दाखवलेली बांधिलकी हुंगता येते. भविष्यात आपली दृष्टी अधिक खोलवर खिळवत आभासी दुनियेची लक्तरे ओरबाडता येऊ शकतील अशी आशादायक वैशिष्ट्ये कवीमध्ये उपस्थित असल्याचे जरूर सांगता येते.

काळोखाच्या कविता मधून स्वतःवर खिळलेला कवीचा डोळा काय चित्र पाहत आहे? स्वातंत्र्योत्तर भारतातील खेड्यातला त्याचा जन्म. खेडे आणि शहर यांच्या सीमारेषा तशा डांबरी रस्ते आणि यष्ट्या यांच्या माध्यमातून धूसर झालेल्या. कवी आधुनिक दिवसात जरूर जन्मलाय पण घरासाठी आई वडिलांचे धडपडणे जे चित्रित झाले आहे ते जुन्या काळाशी वाचकाला बांधून ठेवते आहे. त्याने चित्रित केलेल्या दृश्यांतून आई, वडील, बहिण आणि तो स्वतः, शिवाय त्याच्या भोवतीचा वर्गभेदात्मक समाज यांची रेखाटणे आपल्यासमोर येतात. आई वडिलांच्या संसारात वावरलेले कवीचे लहानपण आणि तरुणपण स्वातंत्र्य मिळून कितीतरी दशके मागे पडलेल्या दिवसांना अस्वस्थकारकच आहे.

गावात आईबाप पाटलाच्या शेतावरचे मजूर आहेत. पण त्यातूनही नव्या दिवसांनी शाळा आणि तिथे मिळत गेलेल्या शिक्षणाच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या वाट्यास आलेल्या अनुभवविश्वातून सुटका करवून घेण्याची संधीसुद्धा त्याला मिळालेली आहे. या संधीने त्याचे जगणे आई वडिलांहून निराळे घडत जाते आहे. कवीने त्याच्या बाबत घडत निघालेले हे नवे बदल टिपण्याचा केलेला प्रयत्न येथे शब्दरूपे धारण करत जातो. एकीकडे

आपले आईवडील शेतीवाडीत काबाडकष्ट करत आहेत आणि आपण त्याच वेळी रोज झकपक होऊन शहरात जाऊन तेथील महाविद्यालयातील मुलांना थकलेल्या मायबापाची कविता शिकवून संध्याकाळी आईवडिलांच्याही आधी घरी परतत आहोत. स्वतःवर खिळलेल्या कवीच्या डोळ्याने रेखाटलेले हे वर्तमान संवेदनशील वाचकाला विचारात टाकू लागते. जुने आणि नवे दिवस यांच्यात कोणत्याही प्रकारचा ताळमेळ नसावा, उलट तो हरवून जावा हे वास्तव येथे उमटते. भारतीय आधुनिक दिवसांनी निर्माण केलेली ही वस्तुस्थिती या कवितांनी टिपलेली दिसते.

फाटक्या कपड्यात बाप ढोरे घेऊन रानात गेला, अनवाणी पायांनी माय शेतात राबायला गेली आणि अशा आईबापाच्या पोटी जन्मलेल्या तरुणाला शिक्षणातून वाट्यास आले ते 'शहर'! मी / परततो दोघांच्याही आधी / शहरातल्या पोसंना / थकलेल्या मायबापाची कविता शिकवून या ओळी वास्तविक वर्तमान काळाने केलेले कन्फेशन आहे की काय असा प्रश्न पडतो. काय आहे आणि काय असावे या विचारांच्या द्वंद्वात अडकलेल्या मानसिकतेचे, आजच्या वर्तमानाच्या सुरु असणाऱ्या फरफटीचे हे प्रतिनिधित्व वाटते. प्रत्यक्षात जे घडत आहे त्या मागे केवळ ओढले जाणे आहे; त्यामुळे इथे गाव आणि शहर याच्या मधल्या लंबकासारखी कवीची अवस्था बनून गेलेली आहे की काय असे वाटू लागते.

कवितांचा क्रम पाहता कवितांमधून विशिष्ट असे कथानक डोकावत असल्याचे भासते. 'साधूचे कूळ पुसू नये/ नदीचे मूळ पुसू नये / काळोखाचे गूढ पुसू नये' असे सांगत सुरु होणारी ही कविता याच पहिल्या कवितेच्या तिसऱ्या खंडात 'आहे रे आणि नाही रे' या वास्तवाकडे निर्देश करते. अर्थात या वास्तवाचे मूळ कूळ पुसू नये म्हणत ती त्याकडेच निर्देश करत राहते. 'आहे रे' वाल्यांसाठी काळोख कसा आणि 'नाही रे' साठी तो कसा हे स्पष्ट करून इथे दोघांच्याही संदर्भातून काळोख आहे तसाच असणार आहे, त्यामध्ये परिवर्तन होण्याच्या शक्यता नसल्याचे वास्तव निर्देशित करण्याचा प्रयत्न ती करत असल्याचे दिसते. या सद्य वास्तवात शहर की गाव हा उभा राहणारा यक्षप्रश्न कविता समोर ठेवत जाते. माय माती माणसं / ओढून नेतात गावात / पैसा प्रगती प्रतिष्ठा / झुलवत ठेवते शहरात / घोंगावत राहतं डोक्याला / अगणित प्रश्नांचं मोहोळ / उत्तरांना घट्ट चिकटलेला / कभिन्न काळोख अशा शब्दात गाव आणि शहर यांच्या मध्ये घरंगळत असलेला लोलक आविष्कृती साधतो.

पुढे जसे जसे आपण वाचत जातो तसे तिने आईबापाच्या कष्टमय असण्यावर, कष्टकरी आईबापाच्या पोटी जन्मलेल्या भावंडांच्या अस्तित्वावर आपला डोळा खिळवून टाकलेला दिसतो. काहीतरी मार्ग शोधण्याची ही धडपड असावी असे वाटत जाते. गाव आणि शहर या दोन्ही स्तरांचा संपर्क दर्शवणारी ही कविता आपली कथा शोधण्याच्या प्रयत्नातील एक प्रयोग वाटू लागते. खरोखर काय करणार आहेत आपली गावातून शिकून काहीतरी धडपड करत शहरात पोहचलेली माणसे? जीवनाला केवळ भौतिक पातळी तेवढीच असते की काय? मनाचे गावात मागे राहिलेल्या आई व वडलांच्या स्मृतींशी काहीच देणेघेणे नसते की काय? जर असेल तर तगमगी वाचून अन्य काहीच अस्तित्वात नाहीये का? असे विविध प्रश्न या कवितेच्या वाचनातून हळूहळू आपल्या मनात निर्माण होत जातात. ही कविता वर्ग, लिंग, स्तर या पातळ्या नीट आपल्यामध्ये घेऊन पुढच्या वाटचालीत तेजस्वी बनू शकेल असे बीज आपल्यात राखणारी कविता वाटते.

या कवितेचे सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिने आपल्या बापाच्या काळजाला हात घालण्याचा केलेला प्रयत्न. मुळातून काचक सिद्ध झालेल्या प्रस्थापित व्यवस्थेतून उभ्या असणाऱ्या घरासाठी अव्याहत झिजणाऱ्या महान ठरणाऱ्या आईबरोबरच बापासाठीसुद्धा या कवितेचा शब्दगंध दरवळू पाहतो. मध्यमवर्गीय मराठी कवितेत आजवर कवींनी आपल्या आईच्या उपकारांवर, तिच्या त्यागाकष्टांवर मोठ्या प्रमाणात आसवे गाळलेली आपल्याला आढळतात. आईची थोरवी मराठी कवितेला नवीन मुळीच राहिलेली नाही. मात्र तेवढ्या प्रमाणात बापाची तगमग आळवण्याचा प्रयत्न फारसा दिसत नव्हता. पण

काळोखाच्या कवितांनी आई बरोबरच बापाच्या कष्टमये, अस्वस्थकारक जगण्याला आपल्या आस्थेच्या परिघात घेतलेले दिसते आहे. कोणत्या संदर्भातून कवी आईबापाच्या कष्टांचे अधोरेखन करतो आहे याचा मागोवा घेतला की मग आपल्याला प्रस्थापित व्यवस्थेच्या गुंत्यांची कुणकुण लागलेल्या आशयसूत्रांचे कवितांमागे असणारे स्त्रोत दिसू लागतात.

ग्रामीण जीवनातील शेतमजुरांच्या हलाखीचे चित्र साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत कविता करतात, पण त्याच बरोबर त्या जगण्यात होत निघालेले बदल काही सुखाचे नाहीत याचीही जाणीव प्रकट करतात. बापाच्या संदर्भातून या जाणिवा प्रकटत जातात. जनावरांमध्ये जीव गुंतवून अखंड आयुष्य जगत आलेल्या बापाला आता गोठ्यात एकही ढोर / शिल्लक नाही तरीही त्याला 'गडायकाठी अन विळा' घेऊन भल्या पहाटे रानात जाऊन गवताचा भारा आणल्याशिवाय चैन पडत नाहीय हे दृश्य कवितेत उमटते. जगणे कष्टमय असले तरीही माणूस हा प्राणी कशाकशात जीव गुंतवून चालत निघालेला असतो. नशेत आईवर 'हक्का'ने राग काढणारा बाप सुद्धा याला अपवाद असत नाही. त्यानेही जनावरांमध्ये जीव गुंतवलेला असतो. पण आता सर्व बदलून गेलेले आहे. सुधारणेच्या नावाखाली जे होते तेही ओरबाडून घेतले जात असल्याची जाणीव या कवितेला प्रकट करावी असे वाटत असल्याचे दिसते. बापाच्या दुःखाचा प्रकटलेला स्वर निराळे भान देण्याचा प्रयत्न करत असल्याचे लक्षात घ्यावे लागेल. बाप समजून घेण्यासाठी 'सुने खुंटे' ही कविता असो अगर 'ढोरांशी बनलंय बापाचं घट्ट नातं', 'पडीक', 'बटाई', 'ठिबक', पाण्याचा धर्म, समुद्र न पाहिलेला माणूस, सलाईन, ससा रे ससा, चांदीची गाय, धाक, पोरकंपण इ. कविता मुळातून वाचाव्या लागतील. आणखी याचे संदर्भ अनेक कवितांमधून विखुरलेले आढळतील. स्वतः कष्ट उपसणारा हा बाप संस्कृती जतन करण्यासाठी कशी धडपड करतो त्याचे दर्शन हृदयस्पर्शी उतरते. वासरांच्या वाटच दूध / विकलं नाही हलवायाला... असे व्यापारीकरणापासून दूर असणारे जगणे त्याच्या माध्यमातून निर्देशित होते.

गाव पातळीवरील पाटील नावाची पुरुषसत्ताप्रधान व्यवस्था आणि त्याच्या बांधावर हाडाची काडे करणारा बाप नावाचा शेतमजूर असणारा 'पुरुष' यांच्या मध्ये असणारे वर्गभेदाचे संवेदन येथे कवितेत प्रकटत गेले आहे. या दोन पुरुषसत्तांच्या कचाट्यातून आपल्या जीवनाचा आधार म्हणून पुढे आलेल्या 'शाळे'चा खांब मिळवण्यासाठी कराव्या लागलेल्या कसरतीचे चित्र उमटवून कवीने समाज व्यवस्थेतील एक वास्तव निर्देशित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. भारतीय शोषण परंपरेतील उतरंडीचे एक वास्तवचित्र कळतनकळत रेखाटण्याचा प्रयत्न प्रस्तुत कविता करतात. त्यातून वास्तवातल्या वर्तमानाचे दर्शन विस्तृतपणे घडवता येऊ शकेल अशा कथनाची शक्यता सामोरी येतेय. सत्ताप्रधान व्यवस्थेतील दोन पुरुषांच्या अडथळ्यांना पार करत बहुजन समाजातील मुलांना आपली आधुनिक शैक्षणिक वाटचाल शोधावी लागत असल्याचे घडलेले दर्शन सद्य वर्तमानाकडे आपले लक्ष वेधत जाते. 'घरोबा' ही कविता येथे नोंदवावी लागेल.

'घर' ही प्रतिमा एकीकडे सहजीवनातून निर्माण होणाऱ्या एकमेकातील भावबंधांमुळे अतिशय हृद्य असते तर दुसरीकडे ते टिकवून ठेवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या काबाडकष्टाला मर्यादा नसतात असे द्वीध्रुवीय वास्तव येथे आविष्कृतीच्या कक्षेत सामावले आहे. आपल्या शैक्षणिक प्रगतीच्या सहाय्याने उपलब्ध झालेल्या वाटेवरून नव्याचा शोध घेत असता आई व बहिण या शोषित घटकाशी त्याचे नाते अधिकच जिव्हाळ्याचे बनत गेल्याचे प्रकटले आहे. बापसुद्धा तेवढाच प्रिय असल्याने त्याची शेवटी होणारी परवड कवीला द्विधा अवस्थेत टाकू लागल्याचे दिसते. आई, वडील आणि बहिण हे तिन्हीही शोषित घटक शहराकडे वळावे लागलेल्या कवीला आपल्या गावाशी मजबुतीने जोडून ठेवू लागतात हे प्रकट दर्शन येथे विशेष आहे. या सर्व गतानुगतीतून जात असता होणारी काळोखाची जाणीव आणि त्यातूनही घरातील काळोखाला उजळविणारी आई नावाची मिणमिणती चिमणी या प्रतिमा लक्षवेधक बनतात. 'आई' ही मुळातून काळोख्या व्यवस्थेलाही आपल्या मिणमिणत्या प्रकाशाने का असेना पण

मुकाबला करण्यासाठी लागणारी उर्जा पुरविणारी यंत्रणा असल्याची प्रकटणारी जाणीव वैशिष्ट्यपूर्ण आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांच्या प्रभावतील या कवितेचाही कष्टांकडे पाहण्याचा आपला असा एक स्वतंत्र दृष्टिकोण असल्याचे प्रतीत होते. पण त्याच बरोबर समाजशास्त्रीयतेच्या भ्रष्ट बनलेल्या वास्तवाचा अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्नही प्रस्तुत कविता करताना दिसते.

ही कुठली दहशत, सरकारी दवाखाना, पाण्याचा धर्म, सातपुडा, नाळ, तुमचं मन इ. कविता अंतर्मुख करण्याचं सामर्थ्य राखणाऱ्या कविता आहेत.

कवितेची शब्दकळा आपल्या प्रादेशिक भानाचे दर्शन घडवणारी आहे. चिमण्यांची धुळांघोळ (लवकरच पाउस येईल म्हणून...), घरातल्या अडगळीतून झांबलणे(बालपण), गवरीची राख, भारानं वाकलेली कर्दळ ठुणी (माय), रेटकं (गवरीची राख), धोनंपानी, चास; आथ, काजेनं (जीव खोलखोल डोह), काटवण, वासन, जंगट विळा (विळा), तरवडीची फुले, शिकोरी (मायनं कविता लिहिली असती तर), जित्राब (ढोरांशी बनलय बापाचं घट्ट नातं), सालदारकीचं दुस्सर, बटाई, झीरं (ठिबक), गावड्या-वासरं-गोऱ्हे, हेलं-वगारू-म्हसडा(सुने खुंटे), गाडोगंती (शेतमजूर), गव्हाऱ्या, धसकटं (ही कुठली दहशत), ब्याडणं, व्हका, भुगल्या(घरोबा), कायभुईची वावरं, फफुटा, भोंडे हात, मरतुकडं डंगर(मजबुरी), कपाशीची बोंडं, चासेबंदी व्हक्यावर, उफननी (शेतमजुराच्या पोरी), ओव्हा (चांदीची गाय) इ. उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. एकूण ही कविता वर्गभेदातून जात पुढे प्रवास करण्याची मनीषा राखणाऱ्या मानवी प्रज्ञेची कविता आहे. आधुनिक जगात अस्तित्वात आलेल्या मजुरांच्या संदर्भातील जागरणाचे दर्शन घडवत सामाजिक, आर्थिक शोषण व्यवहारावर प्रकाश टाकणारी कविता आहे. भारतीय समाज व्यवस्थेत तळागाळातील पातळीवरच्या 'बाप' नावाच्या अस्तित्वाचे मराठी काव्य क्षेत्रात अपवादात्मक आढळणारे हृदयस्पर्शी दर्शन तिने घडविले आहे.

■■■

अंक मिळत नसल्याच्या तक्रारी अलीकडे वाढलेल्या आहेत. गेल्या वर्षातील मार्च, २०२० पासून कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मार्च, २०२० ते जुलै, २०२० पर्यंत अंक पीडीएफ स्वरूपात ऑनलाईन पाठवला जात होता. त्यानंतर ऑगस्ट, २०२० पासून पोस्ट सेवा पूर्ववत सुरू झाल्यानंतर पुन्हा आपणास छापील अंक आपल्या वर्गणी देऊन नोंदविलेल्या पत्त्यावर पाठवला जात आहे. ज्या सभासदांच्या वर्गणीची मुदत संपलेली आहे, त्यांनी आपली वर्गणी भरून सहकार्य करावे. तरीदेखील यासंदर्भात सभासदांना कोणतीही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करा.
**संपर्क क्रमांक :** ८२७५४४९६१६, ०९४२११३८८७२, ९७६५७८७३१३